Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-10 | Nov-2014
Available online at www.lbp.world

# आनंदीबाई जोशी : पहिली महिला डॉक्टर

**प्रा. नंदिनी गणपती काळे**
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली.

आनंदीबाई जोशी महाराष्ट्रातील आणि भारतातील पहिल्याच महिला डॉक्टर 22 वर्षाच्या छोटयाशा आयुष्यात आत्मबलाने सोशिकपणे प्रतिकुल परिस्थितीत अमेरिकेत डॉक्टरी शिक्षण पूर्ण केले. त्यांचे पती गोपाळराव जोशी एक विक्षिप्त सुधारक, काशीबाई कानिटकर या समकालीन लेखिकेने आनंदीबाई चरित्रलेखन केले यात त्यांनी आनंदीबाईंची पतिनिष्ठा, स्वाभिमान, देशप्रेम यांचा उहापोह केला आहे. राम जोगळेकर यांचे आनंदी गोपाळ हे नाटक श्री. जोशी यांची आनंदी गोपाळ नावाची कांदबरी, टी.व्ही.सिरियल आनंदी गोपाळ यामध्ये आनंदीबाई म्हणजे मातीचा गोळा, मेणाचा पुतळा एक घाबरलेलं, भेदरलेलं व्यक्तिमत्व असे दर्शविले आहे. याउलट गोपाळ जोशी म्हणजे एक झंझावत ज्याने आनंदीस लपेटून टाकले. समाजाशी संघर्ष करीत तिला डॉक्टर बनविले. यात गोपाळरांवाचे विपर्यस्त कौतुकच जास्त दिसते. आनंदीबाई गोपाळरावांच्या महत्त्वाकाक्षेच्या वेदीवर बळी गेलेली स्त्री, असे त्यांचे व्यक्तीमत्वदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

### 1) जीवनदर्शन (परिचय) :– (30 मार्च 1865 – जन्म)

आनंदीबाईंचा जन्म कल्याणच्या खानदानी पण निर्धन कुटुंबात झाला. लहानपणी त्या सशक्त, थोराड होत्या. त्यांचे कुटुंबिय त्यांना 'मल्ल' म्हणत. 9 व्या वर्षी गोपाळराव जोशी या पोष्ट मास्तराशी त्यांचे लग्न झाले. 12 व्या वर्षी मुलगा झाला पण अल्पकाळात वारला. त्यांची वैद्यकीय शिक्षण घेण्याची इच्छा येथेच तीव्र झाली असावी. आनंदीने शिक्षण घेतले पाहिजे ही लग्नापूर्वीची अट व नंतर अट्टाहास होता.

### 2) विक्षिप्त पती :–

गोपाळराव जोशी विधूर होते. त्यांना विधवा पुर्नविवाह करायचा होता, पण ते शक्य झाले नाही. त्याकाळात स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालविवाह, संमती वय कायदा या संबंधी समाजसुधारकांचे कार्य सुरू होते. महादेव गोविंद रानडे (1842–1901), महात्मा फुले (1858–1890), गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी (1823–1852), विष्णूशास्त्री पंडित (1828–1876), महर्षी धोंडो केशव कर्वे (1858–1962), गोपाळरावांवर यांचा प्रभाव असल्याचे दिसते. परंतु स्त्रीस दुय्यम स्थान देणारा 'रूढीवादी पुरूष' गोपाळरावांमध्ये सतत डोकावतो. चुरचुरीत, चटकदार, विक्षिप्त, बावळट स्वभावाचे दर्शन कादंबरी, नाटकातून घडते. उदा. त्यांचे सासरे गोपाळरावांना म्हणतात, ''स्त्री शिकली तर व्यभिचारी होईल. तुमची पत्नी व्यभिचारी ठरली तर? गोपाळराव उत्तर देतात, 'पेढे वाटीन'[1] आनंदीबाईचे चरित्र लेखन करणाऱ्या काशीबाई कानिटकर

म्हणतात, समाजात काहीतरी गडबड असावी, हे गोपाळरावांना आवडत असे. पंचहौद मिशन सहभाग हे त्यातीलच एक. (विष्णू मोरेश्वर भिडे – सहाय्य होते)[2]

### 3) शिक्षणासाठी प्रयत्न :–

19 व्या शतकाच्या अखेरीस सामाजिक सुधारणेबाबत तीन प्रश्न अग्रक्रमाचे होते. स्त्री शिक्षण, बालविवाह, विधवांचे पुनर्वसन. आनंदीबाई घरीच मराठी शिकल्या. संस्कृत व मराठीची त्यांना तोंडओळख झाली. मुंबईसारख्या मोठया इलाख्यात गोपाळरावांची बदली झाली. त्या तेथे मिशनरी शाळेत शिकल्या. आनंदीबाईंच्या पूर्वी सावित्रीबाई फुले नंतरच्या काळात बाया कर्वेना झालेली दगडफेक, कुत्सित टवाळी असे अनुभव आनंदीबाईंना ही आले.

जोशी दांपत्य कोल्हापूरात असताना तेथील अमेरिकन मिशनचे 'गोहिन' यांच्या मदतीने गोपाळरावांनी प्रिस्टनच्या रेव्हरंड वाइल्डर यांना पत्र लिहिले. आनंदीबाईंना उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यासाठी मदत मिळावी, पण ते जमले नाही. हा पत्रव्यवहार 'प्रिस्टनच्या मिशनरी रिव्हयू' मध्ये छापून आला. मिसेस कार्पेटर यांच्या पहाण्यात योगायोगाने आल्यानंतर त्यांनी आनंदीबाईंना पत्रव्यवहार केला. आनंदीनेही पत्रे लिहिली. आपल्या चालीरित्या, पोषाख, रूढी, परंपरा तसेच अमेरिकन संस्कृतीबदलही जाणून घेतले व त्यांनाही कार्पेटर मावशी म्हणू लागल्या. एका अमेरिकेत स्त्रीस भावनिक गुंफून घेतले हा ही आनंदीच्या गुणांचा एक पैलू आहे.

### 4) जीवनातील तणाव–उद्रेक :–

आनंदीबाई व गोपाळराव यांचे सहजीवन गोपाळरावांच्या तऱ्हेवाईकपणा, हट्टीपणा, विक्षिप्तपणा यामुळे कष्टप्रदच होते. आनंदीच्या पत्रात उद्रेकही स्पष्ट डोकावतो. गोपाळरावांना लिहिलेल्या पत्रात त्या म्हणतात, 'माझ्या आईने देखील घोडयाच्या चाबकाशिवाय कशाचाही उपयोग माझ्यावर केला नाही. चांगले बोलणे लांबच परंतु दगड, काठया व विस्तव यांच्याशी गाठ'

मुलीस दुय्यमत्वाची वागणूक त्याकाळात मिळत असे. पण त्याबद्दल आनंदीबाई परखडपणे खेद व्यक्त करताना दिसतात. एका पत्रात त्या गोपाळरावांना लिहितात, 'आपल्या प्रिय अंतःकरणास मागील गोष्टी काढून दुखवावे अगर आपल्या प्रितीत अंतर आणावे असा माझा मुळीच हेतू नाही... परंतु दहावे वर्षी म्हणजे अगदी लहानपणी अंगावर मोडलेली लाकडे बारावे वर्षी फेकून मारलेल्या खुर्च्या, बुके, मी तुला टाकून देईन, अशा प्रकारच्या धमक्या चौदाव्या वर्षी अमलात आणलेले नाना प्रकार त्या वयाच्या मानाने अतीच कडक होते.'

त्यांच्या पत्रांतून समाजातील बालविवाह अत्याचाराबद्दलची सात्विक चीड दिसून येते. या अत्याचारी स्वयंकेंद्री गोपाळरावांना कोणी समाजसुधारक म्हणले काय? यांना कृष्णापक्षीय (सुधारक) की शुल्कपक्षीय (सनातनी) काय म्हणायचे तरी काय? पत्नीस शिकविताना, डॉक्टर बनवितात म्हणजे कोणी सुधारक होत नाही. हा आनंदीचा शारीरिक, मानसिक छळच होता. त्यांना मिरवणेच हवे हेतं असेच दिसते.

'शिमग्याच्या खेळयानी सुधारकानी प्रेतयात्रा काढली एका मनुष्यास तिरडीवर बसवून त्याच्या गळयात दारूची बाटली बांधली. या मिरवणूकीत रा.आगरकरांचे दुश्य होते. यात गोपाळराव अग्रणी होते.'[3] गाढवाच्या लग्नाची पत्रिका लग्न हा प्रसंग ही त्यांच्या गंमतीदार स्वभावाचे वर्णन करणारा आहे.

गोपाळरावांच्या अशा वर्तनानी आनंदीबाईंनी त्रासच झाला. अमेरिकेत असताना स्वधर्म, संस्कृती जपत असताना त्यांच्या चारित्र्याचा संशय घेणारी, टोचून बोलणारी पत्रे गोपाळरावांनी पाठविली, तेंव्हा आनंदीने सडेतोड उत्तरे दिल्याचे दिसते.

### 5) आनंदीबाईचे धाडसः–

कार्पेटरबाईंच्या सहाय्याने अमेरिकेत वास्तव्य करून डॉक्टरी पदवी शिक्षण घेण्याचे आनंदीबाईंनी ठरविले. त्या काळातील सामाजिक परिस्थिती पहाता एक गरीब ब्राम्हण स्त्री कुणी आपले माणूस बरोबर नाही, अनुभव नाही, तरीही मिशनरी स्त्रियांबरोबर अमेरिका गाठली. जाण्यअगोदर उठलेले टीकेचे वादळ

शमविण्यासाठी 1883 मध्ये बंगालमधील श्रीरामपूर येथील कॉलेजमध्ये भाषण दिले. तर्कशुध्द विवेचानाद्वारे शंकांचे विवेचन करून भारतात असणारी स्त्री डॉक्टरांची गरज समाजासमोर मांडली.

त्याचकाळात आगरकरांच्या सुधारकात छापलेले एका वाचकाचे पत्र त्याकाळातील परिस्थितीचे दर्शन घडविते. 'स्त्रीयांनी जोडे जाकीटे घालणे म्हणजे स्त्रीजातीची अब्रु घेण्यासारखे आहे. तसेच स्त्रीयांनी सभेत बोलणे, व्याख्याने देणे गैर आहे.'[4]

संस्कृतमधील एक वचन आनंदीस गोपाळरावांनी शिकविले होते.

'अये रूढे वर्णू अतुल महिमा मी तव किती।
तुझे झाले पाही जनसकलाही दास नमती
नमःस्तुभं रूढे खचित असशी तु बलवती।'
(हे रूढे तुला नमस्कार या जगात सर्व लोक तुझे दास झालेले आहेत.)

या रूढीवादास ही आनंदीने प्रतिकूल वातावरणात जोपासले. गरम कापडे वापरले. पेहराव फारसा बदलला नाही, मांसाहार केला नाही, धूराडया खोलीत राहिल्या अशा तणावपूर्ण स्थितीत ही शिक्षण पूर्ण केले. हे ही एक सहनशिलतेची कसोटी पहाणारा प्रसंगाच म्हणावा लागेल.

**6) अमेरिकेतील वास्तव्य :–**

1883 मध्ये त्या अमेरिकेत गेल्या. काही काळ कार्पेटर बाईंजवळ राहिल्या. नंतर 'वुमन्स मेडिकल कॉलेज ऑफ पेनस्ल्विेनिया' येथे प्रवेश केला. डॉक्टरी शिक्षण पूर्ण केले. पदवीदान समारंभास पंडीता रमाबाई हजर होत्या. यावेळी गोपाळरावही अमेरिकेत पोहोचले. भारतीय संस्कृतीच्या गोडवे गाण्याच्या प्रयत्नात अमेरिकन स्त्रिया व्यभिचारी असतात असे भाषण अमेरिकेत जात असताना रस्त्यात केले जाताना बैरागी (साधू) वेषात गेले होते. पं. रमाबाईंबद्दल ही गोपाळरावांचे मत फारसे चांगले नव्हते. 11 मार्च 1886 रोजी वयाच्या 20 व्या वर्षी आनंदीबाईस डॉक्टरीची पदवी मिळाली.

**7) मृत्यु :–**

भारतात परत आल्यानंतर त्या क्षयासारख्या आजाराने ग्रासल्या होत्या. त्या डॉक्टर बनल्याबद्दल प्रसार माध्यमांनी त्यांचे कौतुक केले. ते म्हणतात, 'आंनदीबाई जोशी डॉक्टरी एम.डी.पदवी पास झाल्या. अमेरिकेत पदवी मिळविली हे पहिलेच उदाहरण आहे. परदेशात ही स्वधर्म रक्षण करून, स्वधर्मातील चालीरीती कायम राखून परोपकार करण्यासाठी स्वदेषी परतल्या फारच समाधान झाले.' (सुबोधपत्रिका)

काशीबाई कानिटकर म्हणतात, 'ज्या दोन स्त्रिया रमाबाई व आनंदीबाई अमेरिकेस गेल्या, त्यांनी आपल्या कृतीने दहा पुरूषांपेक्षा एका स्त्रिची योग्यता जास्त असते हे दाखवून दिले.'

कोल्हापूर संस्थानातून आनंदीबाईंना नोकरीकरीता बोलावले होते, त्या जाणारही होत्या. पण 1887 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. कारण अमेरिकेतील प्रकृतीची हेळसांड झाल्याने त्यांना क्षय झाला. कोणत्याही आयुर्वेदाला किंवा डॉक्टरास त्या रोगाने जुमानले नाही. भारतातील पहिली डॉक्टर होवून एकही रूग्ण न तपासता स्वर्गवासी झाली.

**8) आनंदीबाईंचे स्वत्वाचे भानः–**

आनंदीबाईंचे विचार सामाजिक जाणीव असणारे परिपक्व वाटतात. त्या कार्पेटर बाईंशी स्त्रीयांच्या उपेक्षितपणाबद्दल बोलतात. वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाचा त्यांचा विशय 'आर्य हिंदूमध्ये प्रचलीत असलेले प्रसुती शास्त्र' असा होता. यात शास्त्राकार पंडीत रोगनिवारण, प्रसुती काळातील धोके यांचा अंतर्भाव होता.[5]

आनंदीबाईंचे पहिले चरित्र श्रीमती 'कॅरोलाईन डाल' यांनी लिहिले. त्या मिशनरी होत्या. त्यानंतर एका वर्षांनी काशीबाईंनी आनंदीच्या स्वाभिमानाचे, स्वावलंबनाचे, पतिनिष्ठेचे कौतुक त्यांनी लिहिलेल्या चरित्रात केले. 1967 मध्ये आनंदी–गोपाळ ही कादंबरी श्री.ज.जोशीनी लिहिली. त्यात आनंदी भेदरलेली, समाजापुढे झुकलेली स्त्री दर्शविलेली आहे.

ब्राम्हण घरात ही वातावरणातील दबावातही स्वतःचा वेगळा ठसा असणाऱ्या आनंदीबाई त्यांना दिसतच नाहीत. त्यांना दिसतात ते ढोंगी सुधारकीपणाचा आव आणणारे गोपाळराव जोशी.

**9) या काळातील समाजसुधारकांची फळी :–**

या काळात जे सुधारक झाले त्यांना कचखाऊ सुधारकच म्हणावे लागते. न्या.रानडेनी विधवा पुर्नविवाहासाठी काम केले. पण स्वतः 10 वर्षांच्या कुमारीकेशी विवाह केला. त्यांचेच पट्टशिष्य ना. गोखले पहिली पत्नी असतानाही त्यांनी दुसरे लग्न केले. तेही कुमारीकेशी, विधवेशी नव्हे. महर्षी कर्वेनी विधवा विवाह केला. स्त्री कार्यास वाहून घेतले. परंतु त्यांच्या कार्याचा जास्तीत जास्त उपयोग ब्राह्मण व उच्चवर्गीय स्त्रीयांनाच अधिक झाला. र.धों.कर्वेनी कुटुंब नियोजनाचे महत्व सांगितले. आयुष्य वेचले पण स्त्रियांच्या बाबतीत त्यांचे विचारही प्रतिगामीच असल्याचे दिसते. ते म्हणतात, 'स्त्रियांनी लैंगिक आकर्षणाचा उपयोग होईल असेच व्यवसाय पत्करावे.' (जाहिरात, मॉडेल, स्वागतिका)

याउलट म. फुलेंच्या वैचारिक वर्तनाला, कसोटीला, धीरोदत्त स्वभावाला महत्व आहे. त्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या. निपुत्रीक असतानाही दुसरा विवाह केला नाही.[6]

ख्रिश्चन धर्म जगात प्रगतीचा डंका वाजविणारा धर्मही. 'जोन ऑफ आर्क' सारख्या शेकडो संतीणीना धर्मद्रोहाच्या आरोपाखाली चेटकीणी म्हणून जिवंत जाळतो.

सावरकरांच्या समाजसुधारणा चळवळीत एक न्यूनविशेष आढळतो. तो म्हणजे, 'स्त्रीमुक्ती' त्यांच्या समानतेच्या सामाजिक न्यायाच्या कल्पनेत स्त्रीमुक्ती आंदोलन दिसत नाही.

त्या काळातील नाटकात स्त्रीविषयक प्रसंगात (1875) स्त्री शिक्षणास विरोध झाला. परंतु या नाटकात पं.रमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी यांचा उल्लेख येतो.[7]

या समाजसुधारणेच्या लाटेत आनंदीबाईंनी एक वेगळा ठसा उमटवतात. पण त्यांना आपल्या ज्ञानाचा भारतासाठी उपयोग करता आला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. लो. टिळकांच्या आंदोलनात स्त्रीया दिसतच नाहीत. तसे पाहता ॲनीबेझंट (थिऑसॉफिकल सोसायटी), होमरूल चळवळ एक अपवाद. पुढे सरलादेवी चौधुरानी, सरोजिनी नायडू मॅडम कामा (सोशालिस्ट – इंग्लंड अमेरिका) यांच्यापासूनही भारतीय स्त्रियांना स्फूर्ती लाभली नाही. अशा रितीने आनंदीबाईंची वाताहत झाली.

**संदर्भ**

1. आनंदीगोपाळ (कादंबरी) श्री.ज.जोशी पान 54
2. श्रीमती काशीबाई कानिटकर सरोजिनी वैद्य आत्मचरित्र आणि चरित्र
3. श्रीमती काशीबाई कानिटकर सरोजिनी वैद्य आत्मचरित्र आणि चरित्र
4. गोपाळ गणेष आगरकर सुनंदा देशपांडे पान 161
5. साप्ताहिक सकाळ मीरा कोसबी पान17,18
6. म. फुले परंपरा प्रभाकर वैद्य पान 182
7. स्त्री सुधारणा विषयक मराठी नाटयलेखन मृणालिनी शहा पान 79
8. आनंदी गोपाळ नाटक राम जोगळेकर